www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले  उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 146  वार सोमवार दि. 10 फेब्रुवारी २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले  श्री. सुरेश आत्माराम भोईर

## उरण पोलीस ठाण्याच्या वतीने नवीनकायदे विषयक जनजागृती शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने, नवी मुंबई आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली, उरण पोलीस ठाणे आयोजित नवीन कायदे विषयक शिबीर तथा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.उरण येथील आनंदी हॉटेल, भोईर गार्डन,उरण कोटनाका यथे हे शिबीर मोठया उत्साहात संपन्न झाले.या शिबिरा साठी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ,शिबिराच्या प्रमुख मार्गदर्शिका अॅड. तृप्ती पाटील. नागरिक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. समाजात आणि जनमानसात मोठया प्रमाणात विविध समाजमाध्यमांचा वापरकेला जातो याचावपर सायबर गुन्ह्यासाठी मोठया प्रमाणात केला जातो.त्यामुळे सायबर गुन्ह्यात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.हे गुन्हे गुन्हेगार कशा प्रकारे करतात व ते गुन्हे कोणत्या कायद्याच्या कक्षेत येतात याची माहिती त्या कायद्यात झालेली सुधारणा कोणती व या बाबत नवीन कोणते कायदे तयार करण्यात आले आहेत वत्याची अमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येते त्या कायद्याच्या माहिती पासून बहुसंख्य नागरिक हे अनभिज्ञ असतात त्यामुळे असे गुन्हे करणारे याचा फायदा घेतात त्यामुळे समाजात आशा प्रकारचे गुन्ह्याच्या घटनांमध्ये मोठया प्रमाणत वाढ झाली आहे.त्याच बरोबरीने समाज्यात बाललैंगिक अत्याचार प्रकारातही वाढ झाल्याने POCSOA आणि ITPA .याबाबत त्याबाबतजे नवीन कायदे करण्यात आले आहेत त्याबाबत समाजात जनजागृती व्हावी या साठी नवी मुंबई आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाण्याच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

होते.याशिबिरा अंतर्गत उपस्थित पोलीस अधिकारी,व विशेष कायदेतज्ञ अॅड तृप्ती पाटील यांनी सायबर गुन्हे, बाललैंगिक अत्याचार, POCSOA आणि ITPA या नवीन कायदे विषक माहिती देऊन त्याबाबत करण्यात येणारी अंमल बजावणी या संदर्भात सखोल माहिती दिली.त्याच बरोबर कायद्यांच्या विविधकलमांची सविस्तर माहिती दिली.व समाज्यात या घटना कशाप्रकारे घडतात या वेळी मुलीनी,महिलांनी कोणती दक्षता घ्यावी याबाबत सविस्तरपणे माहिती सांगितली.या शिबिराला सर्वांनी चांगला प्रतिसाद दिला



# पनवेल मध्ये नागरिकांच्या विविध प्रश्नांनी आमसभा गाजली, दोन महिन्यांनी आढावा बैठक घेणार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

तब्बल पाच वर्षानंतर पनवेल पंचायत समितीतर्फे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात घेण्यात आलेली आमसभा विविध प्रश्नांनी गाजली. मात्र अर्धेच प्रश्न मांडायला जमल्यामुळे अनेकांनी निराशा व्यक्त केली. नागरिकांनी प्रशासनाच्या विरोधात मांडलेल्या प्रश्नांवर दोन महिन्यानंतर आढावा बैठक घेणार असल्याचे आमसभेचे अध्यक्ष तथा उरणचे आमदार महेश बालदी यांनी सांगितले. यासभेला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, प्रशासक समीर




वाठारकर, अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे, तालुक्याचे व. पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. अकरा वाजता सुरू होणारी ग्रामसभा पावणे बारा वाजता सुरू झाली. त्यानंतर अनेकांनी प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. सिडको, नैना, महानगरपालिका, तहसील विभाग, पुरवठा, प्रदूषण मंडळ या प्रशासना विरोधात अनेकांनी शेकडो प्रश्न उपस्थित केले. प्रदूषण मंडळात विरोधात विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना अधिकाऱ्यांची बोबडी वळली. त्यांना उत्तरे देखील नीट देता आली नाही. यावरून प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांचा निलंबनाचा ठराव घेण्याची मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांची जमीन, पाणी प्रश्न, पुरवठा विभागातील रेशनिंग कार्डसाठी लागणारे पाच ते सहा महिने, येथील खाजगी माणसे या संदर्भात अनेकांनी प्रश्न विचारले. विविध कामांसाठी पनवेल साईनगर येथील तहसीलमध्ये पैसे मागण्याचा आरोप यावेळी करण्यात आला तर काही बँका नागरिकांच्या डीबीटीचे पैसे एजंट आल्यावर देतात असे सांगण्यात आले. करंजाडे आर वन, आर टू, आर थ्री येथे बेकायदेशीर आठवडी बाजार चालतात तसेच अजिवलीला देखील आठवडी बाजार भरतो. हे सर्व बाजार बंद करावेत. पोलीस आणि सिडको या आठवडी बाजाराकडून हप्ते घेत असल्याचा आरोप आमदार महेश बालदी यांनी पोलिसांच्या समोर केला. नौपाडा गावाला स्मशानभूमी हवी तसेच आसुडगाव झेडपी **पान २ वर**

## शुभेच्छा पत्र

**दिनांक: ९ फेब्रुवारी २०२५**
**प्रति,**
**मा. श्री. संतोष जी आमले**
**मुख्य संपादक, दैनिक युवक आधार**
**सप्रेम नमस्कार !**

आपल्या तळमळीच्या आणि परिणामकारक कार्यामुळे युवक आधार हे केवळ वृत्तपत्र न राहता समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम बनले आहे. आपल्या दूरदृष्टीपूर्ण विचारसरणीमुळे आणि निःपक्ष पत्रकारितेमुळे आपण ज्या वेगाने यशाच्या शिखरावर पोहोचत आहात, ते निश्चितच प्रेरणादायी आहे. आपल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत एका मागोमाग एक मिळत असलेले प्रतिष्ठित पुरस्कार हेच आपल्या कर्तृत्वाचा ठळक पुरावा आहेत. विशेषतः या महिना-दोन महिन्यातील हा चौथा पुरस्कार मिळवत आपण पत्रकारितेच्या क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. आपल्यावर होणारा हा पुरस्कारांचा वर्षाव हा आपल्या अविरत मेहनतीचा आणि समाजहितैषी दृष्टिकोनाचा सन्मान आहे.

आपणास पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! ईश्वर आपल्याला उत्तरोत्तर यश देवो आणि समाजहितासाठी आपले योगदान असेच अविरत राहो, हीच प्रार्थना!

**आपला शुभेच्छुक,**
**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

# निफाड येथे दि.12 फेब्रुवारी पासून श्रीखंडेराव महाराज यात्रोत्सव

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादकः-**
**विनोद गायकवाड.**

निफाड परिसराचे आराध्य दैवत श्री खंडेराव महाराज यात्रा उत्सव दिनांक 12.फेब्रवारी.2024 पासून प्रारंभ होणार असून सालाबाद प्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक 7 फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात रथांचा लिलाव करण्यात आला असून या वर्षी च्या रथांच्या लिलावाचे मानकरी.भाऊसाहेब किसन कापसे. यांनी ( एक लाख. आकरा



हजार एकशे आकरारुपये) घेतला असून याचवेळी बारा गाड्यांची पूजन व विविध मान्यवरांचा सत्कार यावेळी करण्यात आला, दिनांक 12 फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजता खंडेराव महाराज मंदिरात होम हवन होणार असून आठ वाजता शनी मंदिरापासून मांडव डहाळे यांची वाजत गाजत मिरवणूक निघणार आहे ,तर नऊ वाजता खंडेराव महाराज पादुकांपासून निफाड कोर्टाच्या मागून कावडीची भव्य मिरवणुकीचा कार्यक्रम होणार आहे, दुपारी दोन वाजता कचेश्वर जानकीराम दुसाने यांच्या निवासस्थानापासून खंडेराव महाराज दैवतांचे पूजनास प्रारंभ होणार आहे तर दुपारी तीन वाजता श्री मारुती मंदिर व शनेश्वर चौकात होम हवन होणार आहे दुपारी साडेचार वाजता **पान २ वर**










## संपादकीय

# आनंदाने जगणे आणि हृदय जिंकणे – जीवनाची खरी कला

लेखक: आसाराम विरकर
उपसंपादक, दैनिक युवकआधार (मराठवाडा आवृत्ती)

जीवनात प्रत्येकाला दीर्घायुष्य हवे असते, पण खरे समाधान म्हणजे त्या आयुष्याला अर्थपूर्ण बनवणे. फुलपाखरू केवळ १४ दिवस जगते, परंतु त्या प्रत्येक क्षणात आनंदाने न्हालेलं असतं आणि आपल्या रंगाने, सौंदर्याने कित्येक हृदये जिंकून जाते. आपले जीवनही असेच आनंदी आणि प्रेरणादायी असावे, जिथे आपण केवळ जगण्यासाठी नाही तर इतरांना प्रेरित करण्यासाठी, आनंद देण्यासाठी, हसण्यासाठी आणि प्रेम वाटण्यासाठी जगावे.

**प्रत्येक क्षण अमूल्य आहे**

आयुष्य आपल्याला दररोज एक नवी संधी देते. प्रत्येक क्षण अनमोल आहे आणि आपण त्याचा कसा उपयोग करतो हे आपल्या विचारांवर आणि कृतींवर अवलंबून आहे. अनेकजण भविष्याची चिंता करत किंवा भूतकाळातील कटू आठवणींत गुरफटलेले असतात, पण खरा आनंद वर्तमानात जगण्यात आहे.

फुलपाखराच्या आयुष्यातील १४ दिवस हे जणू सतत आनंदाचा संदेश देतात. ते कुठेही जात असो, ते आपली मोहकता, सौंदर्य आणि आनंद सगळीकडे पसरवत असते. त्याचप्रमाणे, आपले आयुष्यही असे असावे की जिथे आपण राहू, तिथे आनंद, सकारात्मकता आणि प्रेमाचा सुगंध दरवळावा.

**आनंदाने जगणे – एक जीवनशैली**

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत अनेकजण आपल्या ध्येयांमागे धावत असतात, पण त्याचसोबत जीवनाचा खरा आनंद मिळवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. फुलपाखराने जसे आपल्या छोट्या आयुष्यात प्रत्येक क्षण सुंदर बनवला, तसेच आपणही आपले जीवन अर्थपूर्ण बनवू शकतो.

**छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधा** – रोजच्या जीवनातील छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये समाधान मिळवा. एक सुंदर सूर्योदय पाहणे, पक्ष्यांचे किलबिल ऐकणे, आप्तस्वकीयांसोबत वेळ घालवणे हे आनंदाचे खरे स्त्रोत आहेत.

**इतरांसाठी काहीतरी करा** – दुसऱ्यांसाठी प्रेम, सहानुभूती आणि मदतीचा हात पुढे करा. जेव्हा आपण इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवतो, तेव्हा तो आनंद आपल्याही हृदयात उमटतो.

**स्वतःवर प्रेम करा आणि सकारात्मक रहा** – स्वतःची काळजी घ्या, आपले मन शांत ठेवा, आणि नेहमी सकारात्मक दृष्टिकोन बाळगा. कोणत्याही परिस्थितीत आनंद शोधण्याची कला आत्मसात करा.

**हृदय जिंकणे** – जीवनातील सर्वात मोठा विजय

संपत्ती, प्रसिद्धी किंवा शक्ती मिळवणे म्हणजेच जीवनातील यश असे मानले जाते, पण खरा विजय हा लोकांची मने जिंकण्यात असतो. आपला स्वभाव, आपली कृती आणि आपले विचार जर प्रेमळ असतील, तर आपण सहज लोकांची मने जिंकू शकतो.

**फुलपाखरासारखे अल्पायुषी जीवन असूनही जर ते अनेक हृदये जिंकू शकते, तर आपल्याकडे तर अमूल्य संधी आहे** – आपल्या सहृदयतेने, प्रेमळ स्वभावाने आणि आनंदी जीवनशैलीने जगातील अनेक हृदये जिंकण्याची.

**शेवटी...**

आयुष्य हे फुलपाखराप्रमाणे आहे – ते क्षणिक असते, पण त्याला रंग, गोडवा आणि अर्थ आपणच देतो. त्यामुळे प्रत्येक क्षण आनंदाने जगा, इतरांना प्रेरणा द्या आणि प्रेम व स्नेहाने मने जिंका. कारण जगात सर्वात मोठे यश हे दुसऱ्यांच्या हृदयात आपली जागा निर्माण करण्यात आहे.

**"प्रत्येक क्षण अमूल्य आहे, तो आनंदाने जगा आणि प्रत्येक हृदय जिंकत राहा!"**

# नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे दर शनिवारी 'तक्रार निवारण' दिनाचे आयोजन

## महिनाभरात ३६२५ तक्रारी निकाली

**दैनिक युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी : राजेश भडांगे**

**विंचूर** :- नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे दर शनिवारी 'तक्रार निवारण' दिनाचे आयोजन करण्यात येत असून गेल्या महिनाभरात ३६२५ तक्रारी निकाली निघाल्या आहेत. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यामध्ये शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी "क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा" निश्चित केला आहे. त्या धर्तीवर क्षेत्रीय शासकिय व निमशासकिय कार्यालयाकरीता आगामी १०० दिवसांमध्ये ७ कलमी कृती आराखडा तयार करून त्या मुद्द्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरून नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे दि.१० जाने. पासून आठवड्याचे दर शनिवारी 'तक्रार निवारण' दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर तक्रार निवारण दिनाचे अनुषंगाने नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण आदित्य मिरखेलकर व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील ८ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये तसेच ४० पोलीस ठाणेनिहाय गत महिनाभरात एकुण ३६२५ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. या पोलीस ठाण्यांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी देवुन पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या तक्रारीमधील फिर्यादी व तक्रारदार यांना पोलीस ठाणेस बोलावुन त्यांचे गुन्हा व तक्रारींच्या अनुषंगाने मार्गदर्शन व समुपदेशन तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी देखील वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार तक्रार निवारण दिनानिमित्त तक्रारदारांच्या समस्या जाणुन घेवुन त्यांचे तक्रारींचे निरसन केले आहेत. क्षेत्रीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडयाचे कामकाज सुरू झाल्यापासुन दि. १८ जाने. पहिल्या तक्रार निवारण दिनी १३८२, दि.२५ जाने ७६०, दि.१ फेब्रु. ९२० तक्रारी अर्ज व आज दि.८ फेब्रु.५६३ अशा गेल्या महिनाभरात मिळुन एकुण ३६२५ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने काही तक्रारींसंदर्भात दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे नोंद करण्याची कार्यवाही सुरू असून, काही तक्रारी दिवाणी स्वरूपाच्या असल्याने महसुल विभाग, दिवाणी न्यायालयात दाद मागण्यास्तव तक्रारदारांना समज देण्यात आली आहे.




# उरण खोपटे –बांधपाडा येथे 105 वर्षाची परंपरा जपणारा अखंड हरीनाम,गुरुदशमी व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मोठ्या उत्सवात संपन्न

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

उरण खोपटेबांधपाडा येथील श्री परमपूज्य सद्गुरू गोपाळ काका महाराज ट्रस्ट च्या वतीने श्रीमत्परमहंस जीवनमुक्त स्वामी महाराज्यांच्या पद्स्पर्शाने पावन झालेल्या खोपटे नगरीत अखंड हरीनाम,गुरुदशमी व ज्ञानेश्वरी सोहळा मोठ्या उत्सवात संपन्न झाला. सुमारे 105 वर्षाची परंपरा लाभलेल्या या सोहळ्याचा शुभारंभ माघशुद्ध षष्टीदि.03 फेब्रुवारी 2025 रोजी पहाटे 4:30 वाजता काकड आरतीने करण्यात आला,यावेळी पारंपारिक प्रथे प्रमाणे श्रीगणेश पूजन,वीणापूजन,अखंड नंदादीप प्रज्वलन,व श्रीमत्परमहंस जीवनमुक्त स्वामी महाराज्यांच्यापदुकाचे पूजन करण्यात आले, हा सोहळा रविवार दि. 9 फेब्रुवारी2025 पर्यंत सुरु असून दैनंदिन कार्यक्रमात ,प्रवचन, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे वाचन,हरिपाठ,जागरभजन आदि कार्यक्रम सादर करण्यात आले. दैनंदिन 3 फेब्रुवारीपासून दैनंदिन रात्रो 7:30 ते 9:30 वाजे पर्यंत कीर्तन असे कार्यक्रम सादर करण्यात आले. या मध्ये दि.3 फेब्रुवारी रोजी ह.भ.प.अमित महाराज म्हात्रे (बेलवली पेण), ह.भ.प.विक्रांत महाराज पाडेकर(आळंदी देवाची), ह.भ.प.वैष्णव महाराज जाधव(शिर्डी-कोपरगाव), ह.भ.प.अलकाताई व्हालेकर(पुणे-भोर),शुक्रवार7फेब्रुवारी रोजी विशेष दशमी सोहळ्या निमित्ताने सकाळी 10 वाजता ह.भ.प. नंदकुमार महाराज गावंड (उरण-वशिणी) तर रात्रो 7:30 वाजता ह.भ.प.ओमकार महाराज दुडे (आळंदी),शनिवार दिनांक 8फेब्रुवारी दुपारी ग्रंथदिंडी व सायंकळी खोपटे गावच्या सरपंच सौ. विशाखा ठाकूर यांच्या हस्ते दीपोत्सव साजराकरण्यात आला या दीपोत्सवात पंचक्रोशीतील अनेक भाविकानी सहभाग घेतला होता. रात्रो ह.भ.प.गीतांजलीताई झेंडे यांचे कीर्तन झाले. रविवारदि.9फेब्रुवारी रोजी दुपारी श्रीमत्परमहंस जीवनमुक्त स्वामी महाराज व श्री परमपूज्य सद्गुरू गोपाळ काकामहाराज यांची पालखी मिरवणूक काढण्यात येउन खोपटेगाव सातपाड्यात टाळ मृदुंगाच्या गजरात फिरविण्यात अली.रात्रो ह.भ.प जगदीश महाराज जोशी त्रिंबकेश्वर-नाशिक यांच्या काल्याच्या कीर्तनाने या परायण सोहळ्याची सांगता करण्यात आली. या निमिताने खोपटे बांधपडा येथे मोठी यात्राही भरली होती. या पूर्ण सप्ताहात उरण,पनवेल,पेण,अलिबाग,ठाणे,मुंबई,नवीमुंबई, पुणे नाशिक येथील भाविकांसमवेत पंचक्रोशिंतील भाविकांनी आपली उपस्थिती लाऊन कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.



# श्री छत्रपती हायस्कूल सणसर माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा आनंदी वातावरणात संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर येथे रविवार दिनांक 9.2.2024 रोजी केंद्र क्रमांक 210660 श्री छत्रपती हायस्कूल सणसर या विद्यालयात माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस आनंदी वातावरणामध्ये सुरुवात झाली.परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे केंद्रप्रमुख श्री.सर्जे एस.डी.सर तसेच परीक्षा विभाग श्री भोसले डी.आर.सर,श्री. शामराव यादव सर,श्री भोसले एस.पी.सर श्री सोनवने पी डी सर,श्री.भोईटे एस बी सर व सर्व मॅडम यांचे शुभ हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी परीक्षा केंद्रावर सर्व पर्यवेक्षक शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.या परीक्षा केंद्रावर छत्रपती इंग्लिश मीडियम स्कूल भवानीनगर -9 विद्यार्थी,न्यू इंग्लिश स्कूल लाकडी -17 विद्यार्थी,श्री छत्रपती मुलींचे हायस्कूल -19 विद्यार्थी,गोविंदराव पवार विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज भवानीनगर-6 विद्यार्थी,श्री छत्रपती हायस्कूल सणसर -10 विद्यार्थी,श्री छत्रपती हायस्कूल व जुनिअर कॉलेज भवानीनगरचे-18 विद्यार्थी,श्री छत्रपती हायस्कूल शिंदेवाडी-6 विद्यार्थी.असे एकूण-85 विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले.परीक्षार्थी आनंदी वातावरणामध्ये परीक्षेस प्रविष्ट झाले.




# लोकप्रिय मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळीने कुंभमेळ्यात केले शाही स्नान, सोशल मीडियावर व्यक्त केली भावना



**नाशिक** – मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने कुंभमेळ्यात भक्तीभावाने शाही स्नान केले. या पवित्र क्षणाचा अनुभव घेतल्यानंतर तिने आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या. प्राजक्ता माळीने कुंभमेळ्यातील पवित्र वातावरणाचा अनुभव घेतला आणि स्नानानंतर आपल्या भावना मांडताना ती म्हणाली, "कुंभमेळा हा केवळ धार्मिक सोहळा नाही, तर आपल्या संस्कृतीचा एक अनमोल ठेवा आहे. येथे येऊन मानसिक आणि आध्यात्मिक शांती लाभते. शाही स्नानाचा हा अनुभव अविस्मरणीय आहे."

**कुंभमेळ्यात प्राजक्ता माळीचा सहभाग चर्चेत**

कुंभमेळा हा हिंदू धर्मातील सर्वात मोठा धार्मिक सोहळा असून, यात लाखो भाविक सहभागी होतात. प्राजक्ता माळीच्या शाही स्नानाची चर्चा सोशल मीडियावर जोरदार सुरू आहे. तिच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या असून, काहींनी तिच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाला जपण्याच्या भूमिकेचे कौतुक केले आहे.

**धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन**

प्राजक्ता माळीने नेहमीच महाराष्ट्राच्या संस्कृती आणि परंपरांना मोठे स्थान दिले आहे. याआधीही तिने विविध धार्मिक स्थळांना भेटी दिल्या असून, आपल्या पारंपरिक आणि सांस्कृतिक वारशाचा सन्मान करण्याचा संदेश दिला आहे.

**श्री. आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

# एसटी विभागीय कार्यालय नांदेड येथील वरिष्ठ लिपीक रमेश सोने यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड वार्ताहर -** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभागीय कार्यालय नांदेड येथील वरिष्ठ लिपीक रमेश पिराजी सोने हे प्रदीर्घ सेवेनंतर 35 वर्षे सेवा बजावून नुकतेच सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा पांडव निवास ओंकारेश्वरनगर मालेगाव रोड नांदेड या त्यांच्या निवासस्थानी सोने परिवार व पाहुणे मंडळी मित्र परिवाराच्यावतीने दि. 08 फेब्रुवारी 2025 शनिवार रोजी सत्कार सोहळा व सस्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी सेवानिवृत्त कर्मचारी रमेश पिराजी सोने व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. गोदावरी रमेश सोने यांचा पुष्पहार देऊन सपत्नीक हृदय सत्कार केला. यावेळी गुणवंत एच. मिसलवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, रमेश पिराजी सोने हे एसटी च्या प्रवाशी सेवेमध्ये आपले कर्तव्य चोखपणे बजावून अनेक टेबलला काम करताना कामगार- कर्मचाऱ्यांबद्दल सहकार्याची भावना ठेवून कार्य केले, असे प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की, स्मितहास्य, मृदू स्वभाव असे त्यांचे व्यक्तीमत्त्व असून एसटीच्या प्रवाशी सेवेमध्ये त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे, असे सांगून त्यांना भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून किशनराव सोने, गुणवंत एच. मिसलवाड, लक्ष्मण सुपारे, नामदेव मसलगे, वसंत साबळे, संजय कल्याणपाड, श्याम पाटील सुर्यवंशी, संतोष भालेराव, गजानन टोणगे, गोविंद हाळे, शिल्पदिप हिंगोले, किशोर धोंगडे, सोपान कोळनुरे, सौ. लता कोळनुरे, पवन कोळनुरे, लक्ष्मणराव तुडमे, विजयकुमार पटवर्धन, देविदास सुरवाड, बालकिशन गोपुला, सरदार हरपालसिंघ यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पाहुणे मंडळी व एसटी महामंडळाचे चे आजी- माजी कामगार- कर्मचारी, इष्टमित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. लगेचच सर्व उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.



# पनवेल मध्ये नागरिकांच्या विविध प्रश्नांनी आमसभा गाजली, दोन महिन्यांनी आढावा बैठक घेणार

**पान १ वरुन** शाळा परिसरातील शौचालय कोणी तोडले त्याच्यावर कारवाई करावी, नेरे ते शेडुंग रस्ता अर्धवट असून ते पूर्ण करावे, स्मार्ट विद्युत मीटर नको, भाताण येथील समाजमंदिराचे भूमिपूजन होऊन काम सुरू झाले नाही. अमेटी यूनिव्हर्सिटीने 1 हजार फूट बोअरवेल खोदल्या आहेत त्यामुळे भाताण गावात पाणी येत नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. कर्नाळा बँकेत पैसे ठेवणाऱ्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्यास सांगितले. तसेच खांदेश्वर रेल्वे स्टेशन समोरील पार्किंग इमारतीचे काम पूर्ण करावे, कामोठे सिडको नोडल ऑफिस कामोठेत पुन्हा चालू करावे, खांदेश्वर स्टेशन समोरील आर एम सी प्लांटमुळे प्रदूषण होते तो त्रास बंद करावा अशी मागणी करण्यात आली. सायंकाळी पाच वाजता वेळेअभावी ही आमसभा गुंडाळण्यात आली. मात्र अनेकांचे प्रश्न विचारायचे राहून गेले. यावेळी प्रशासना बद्दल जे काही प्रश्न असतील ते लिहून देण्याचे महेश बालदी यांनी सांगितले.

# निफाड येथे दि.12 फेब्रुवारी पासून श्रीखंडेराव महाराज यात्रोत्सव

**पान १ वरुन** बाळासाहेब भानुदास लोखंडे यांचे जाणूनच घरी भागवत बाबांचे स्नान अंघोळीचा कार्यक्रम होणार आहे सायंकाळी साडेसहा वाजता रथ व बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे याचे मानकरी नंदू भाऊ रमेश शेलार हे आहेत यावर्षीच्या यात्रा कमिटी अध्यक्ष पदी सुभाष कर्डिले, उपाध्यक्षपदी संजय दादा कुंदे, कार्याध्यक्ष नंदलालजी चोरडिया सचिव देवदत्त कापसे ,सह सचिव नामदेव लक्ष्मण जाधव,खजिनदार महेश जंगम,. प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र जी थोरात ,सह. खजिनदार विपुल सेंद्रे तर सांस्कृतिक कार्यक्रम अध्यक्षपदी साहेबराव बर्डे, उपाध्यक्ष सचिन गीते ,यांची निवड करण्यात आली आहे या वेळी राजाराम छ. शेलार, राजाभाऊ राठी, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे शिवाजीराजे ढेपले ,भागवत बाबा शेलार, रघुनाथ कुंदे ,रमेश जाधव, मधुकर शेलार, दौलतराव कापसे ,रतन गाजरे, योगेश कुंदे, संजय धारराव,विक्रम रंधवे, मुकुंद होळकर,संदिप शिंदे,आदी नागरिकांचे यात्रा कमिटीला मार्गदर्शन लाभणार आहे, याप्रसंगी निफाड नगरपंचायत च्या नगराध्यक्षा डॉ. कविता नितीन धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, मुख्याधिकारी अमोल चौधरी , तसेच नगरसेवक ,नगरसेविका, कर्मचारी वृंद व यात्रा कमिटी मार्गदर्शक , ग्रामस्थ उपस्थित होते

# निफाडला नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार व पदाधिकाऱ्यांचे स्वागत

## समाजाच्या विकासासाठी संघटनेचा पाया मजबूत होण्याची गरज : सयाजीराव झुंजार

**दैनिक युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी**
**: राजेश भडांगे**

**विंचूर** :-महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार, माजी प्रदेशाध्यक्ष दत्ताशेठ अनारसे, माजी प्रदेश उपाध्यक्ष अशोक सुर्यवंशी, नारायणराव यादव,राजेश जाधव, अरविंद देसाई, अरुण सौंदाणे नवनिर्वाचित प्रदेश उपाध्यक्ष संजय गायकवाड, महिला उ.महाराष्ट्र अध्यक्ष सिमाताई राऊत, महिला जिल्हाध्यक्ष संगीताताई मगर,महिला नासिक शहराध्यक्ष सविताताई सस्कर,नासिक लोकसभा अध्यक्ष सुरेश सुर्यवंशी, दिंडोरी लोकसभा जिल्हाध्यक्ष अनिल वाघ यांचे निफाड येथील शांतीनगर चौफुली येथे नाभिक महामंडळाचे निफाड तालुका, अध्यक्ष डॉ.प्रकाशजी वाघ तालुका उपाध्यक्ष प्रमोद भाऊ सोनवणे यांच्या हस्ते सर्व पदाधिकार्यांचे शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले. यानंतर निफाड पिंपळगाव रोड येथे साकार होत असलेल्याश्री.विठ्ठल रुख्मिणी,श्री. संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज व श्री.संत सेना महाराज मंदिराच्या बांधकामास भेट देण्यात आली.यावेळी श्री संत सेना फाउंडेशनचे अध्यक्ष व निफाड शहरातील सर्व नाभिक समाज बांधवांच्या हस्ते पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला.

**यावेळी मंदिराचे होत असलेल्या कामाबद्दल आनंद व्यक्त केला**

यावेळी प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यानी आपले मनोगत व्यक्त करताना संघटन समाजाचा पाया मजबूत करण्यासाठी गरजेचे असुन सर्वच समाजामध्ये संघटनेला एक वेगळे महत्व असते आपला व्यवसाय सांभाळत संघटनेच्या माध्यमातून समाजकार्य करता येते त्याचा फायदा नक्कीच होतो त्यामुळे संघटनेच्या प्रवाहात येणे गरजेचे असल्याचे मत झुंजार यांनी व्यक्त केले. यावेळी नाभिक महामंडळाचे प्रदेश उपाध्यक्ष संजय गायकवाड,आप्पासाहेब सुर्यवंशी,नारायणराव यादव, अरविंद देसाई,अनिल वाघ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी नाभिक महामंडळाचे निफाड तालुकाध्यक्ष डॉ.प्रकाश वाघ, तालुका उपाध्यक्ष प्रमोद भाऊ सोनवणे, वैभव वैद्य,मनोज अनारसे गणेश मगर,प्रविण कडवे,प्रमोद तुपे, मच्छिंद्र साळुंके, अविनाश देसाई,अभिजीत जगताप, नंदु बनभेरु, पिंटू बनभेरु,किशोर साळुंके,संतोष वाघ,संदिप आहेर,रत साळुंके भैरु कोरडे,शैलेश सोनवणे,शशिकांत महाले,मधुकर कणसे,कृष्णा महाले,मनोज खडांगळे,जेष्ठ मार्गदर्शक सोमनाथ सोनवणे,निफाड शहराध्यक्ष संजय आहेर,शरद वाघ, विजय सोनवणे,किशोर बिडवे,दिपक जाधव, राकेश सोनवणे,ज्ञानेश्वर गायकवाड, संतोष पंडीत, विशाल कणसे,सिताराम गायकवाड,संदिप सोनवणे,गणेश मगर,संदिप शिंदे,नवनाथ वाघ,मयुर सोनवणे, नारायण सुर्यवंशी,रवी गायकवाड,बाळु बोरसे, संजय शिंदे यांसह तालुक्यातील नाभिक समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भरधाव वेगात आलेला कंटेनर कठीण वळणावर कारवर पलटी

**दैनिक युवक आधार**
**पेण -वार्ताहर**

पनवेल मार्गावर कर्नाळा खिंडीत महाभीषण अपघात

चालक जगदीश हाजरा जागीच ठार तर गाडी मालक पल्लवी जोशी गंभीररित्या जखमी पनवेल, दि.8 (वार्ताहर) : ठाण्यावरून वडखळ कडे जाणाऱ्या एका कारला भरधाव वेगात जाणाऱ्या कंटेनरने धडक देवून कारवर पलटी झाल्याने या अपघातात एक ठार 1 जखमी झाल्याची घटना कर्नाळा खिंडीत घडली आहे.कार मध्ये असलेले पल्लवी जोशी या कार मालक ड्रायव्हर जगदीश हाजरा यांच्या सोबत ठाण्याहून वडखळ कडे जात होते. ते कर्नाळा खिंडीत आले असता भरता वेगात येणाऱ्या कंटेनरने गाडीला जोरदार धडक देत गाडीवरच पलटी झाला. कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून चालक जगदीश हाजरा यांना या अपघातात आपले प्राण गमवावे लागलेत. तर पल्लवी जोशी या गंभीररित्या जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेत जखमींना गाडीबाहेर काढले. हायड्राच्या सहाय्याने गाडीवरील पळटलेला कंटेनर बाजूला काढण्यात आला.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# लाईफलाईन अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश!

## पहिल्याच वर्षी पटकावली चॅम्पियन ट्रॉफी.

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथे नुकत्याच झालेल्या नॅशनल लेवल अबॅकस स्पर्धेत कडा येथील लाईफलाईन अबॅकस क्लासेसच्या चार पैकी चार विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. नुकत्याच झालेल्या नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेमध्ये लाईफलाईन अबॅकस क्लासेसच्या चार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये चॅम्पियनची ट्रॉफी पटकावत अनुष्का अरुण ओव्हाळ हिने सर्वांचे लक्ष वेधले. तसेच सिद्धी परसराम हंबर्डे आणि समृद्धी योगेश बोडखे या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक मिळवला तर सफा मोहसीन पठाण हिने तृतीय क्रमांक मिळविला. अनुष्का अरुण ओव्हाळ या विद्यार्थिनीचा शंभर टक्के अचूक उत्तरांसाठी विशेष सन्मान करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे लाईफलाईन अबॅकस क्लासेस चे संचालक साजिद पठाण सर यांनी अभिनंदन केले.




# नागोठणे लायन्स क्लब आयोजित डोळे तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर संपन्न

## 14 रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे रवाना

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

लायन्स क्लबच्या आयोजित यशवंत चित्रे यांचे सौजन्याने कै.सुलेखा चित्रे यांचे स्मरणार्थ पाचवा स्मृती दिनानिमीत्त तसेच आर. झुनझुनवाला - शंकरा आय हॉस्पीटल न्यु पनवेल यांच्या विद्यमाने बाळासाहेब ठाकरे नगर मधील लायन्स क्लबच्या सभागृहात बुधवार 05 फेब्रुवारी रोजी मोफत




चेअरमन विवेक सुभेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लायन्स क्लब

आले. मोतिबिंदू मुक्त रोहा तालुका अभियान अंतर्गत लायन्स

काय घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन विवेक सुभेकर यांनी केले. या कार्यक्रमाला जयराम पवार,विलास चौलकर,दौलत मोदी,सुधाकर जवके,संतोष शहासने,दिपक गायकवाड,विवेक करडे,विशाल शिंदे,दिपक लोणारी,वरद उपाध्ये,श्वेता चौलकर, सुजाता जवके,यांच्यासह महादेवसिंग परदेशी, प्रकाश जाधव,रोहीदास हातनोलकर तसेच क्लबचे सर्व पदाधिकारी सदस्य, आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटलचे डॉक्टर व त्यांचे सहकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

**होतकरु विद्यार्थ्याला त्याच्या उज्वल भविष्यासाठी लॅपटॉप भेट -** सदरील कार्यक्रमात यशवंत चित्रे यांनी लायन्स क्लबच्या वतीने कु.अर्थव गजानन सवादकर या होतकरु विद्यार्थ्याला त्याच्या उज्वल भविष्यासाठी लॅपटॉप भेट दिला.अथर्व याला लहानपणापासुन चित्रकलेची आवड असून त्याच्या आईवडीलांनी त्याला प्रतिकूल परिस्थितीत त्याच क्षेत्रात शिक्षण देत आहेत. त्याने त्या कलेमध्ये विशेष प्राविण्य मिळवित असून त्याच्या पुढील उज्वल भविष्यासाठी यशवंत चित्रे यांनी लॅपटॉप देवून त्याचा सन्मान केला. यावेळा त्याचे वडील गजानन सवादकर व आई गितांजली सवादकर यांचाही सन्मान शाल श्रीफळ पुष्प देवून करण्यात आला.

डोळे तपासणी व मोतिबिंदू ऑपरेशन शिबिराचे उद्‌घाटन शैक्षणिक विभाग डिस्ट्रीक्ट चेअरमन यशवंत चित्रे,नागोठणे लायन्स क्लब अध्यक्ष सुनिल कुथे,सेक्रेटरी डॉ.अनिल गीते, झोन डायमंड अलिबाग सेक्रेटरी अड. अंकिता पाटील यांचे हस्ते करण्यात आले. या शिबिराचा 62 रुग्णांनी लाभ घेतला असून त्यापैकी 14 रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नवीन पनवेल येथे पाठविण्यात क्लब तर्फे आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल पनवेल यांचे सहकार्याने गेली तीन वर्ष अभियान राबविण्यात येत असून यावेळी डॉ अनिल गिते यांनी उपस्थितांना डोळ्याची काळजी

# रामेश्वरम येथे भक्तीपथ सेवा फाऊंडेशनच्या वतीने राबविले तिर्थक्षेत्र स्वच्छता अभियान

### या अभियानात भक्तीपथ सेवा फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी व भविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला

**दै. युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी**
**जनार्दन चव्हाण**

**विंचूर:** रामेश्वरम: भक्तीपथ सेवा फाऊंडेशनच्या वतीने तिर्थक्षेत्र रामेश्वरम येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानात भक्तीपथ सेवा फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी व भविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, पुणे, नाशिक मुंबई,हिंगोली,बारामती, सातारा, जालना,संभाजीनगर,येथील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि त्यांनी भक्तीभावाने तिर्थक्षेत्र रामेश्वरम येथील मंदिर परिसर व सुमुद्र किनारा येथील श्रमदान करून स्वच्छता अभियान राबविण्यात आला. भक्तीपथ फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून देव, देश आणि धर्म यासाठी कार्यरत असून, देश-विदेशात सनातन धर्माचा प्रचार व संतांचे विचार पोहोचवणे, तसेच भक्ती सेवा आणि श्रमदानाच्या माध्यमातून समाजसेवा करणे हा त्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमादरम्यान समुद्रकिनारा आणि परिसर स्वच्छ करण्यात आला, तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री शेषजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम राबवण्यात येतात अशी माहिती भक्तीपथ सेवा फाऊंडेशन चे उपाध्यक्ष दिपक चव्हाण यांनी दिली. उपक्रमादरम्यान फाऊंडेशनचे अध्यक्ष शेषजी महाराज व फाउंडेशन चे पदाधिकाऱ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा संकल्प केला.ह्या वेळी रामेश्वरम देवस्थान व स्थानिक प्रशासन यानी ह्या उपक्रमाचे कौतुक केले असून,यावेळी भक्तीपथ फाऊंडेशनच्या सर्व सदस्यांना शुभेच्छा ही देण्यात आल्या.



# शिवजयंती निमित्त दैनिक युवक आधारच्या वतीने आष्टी तालुकास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**आष्टी वार्ताहर**

आष्टी तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने 19 फेब्रुवारी छत्रपती शिवरायांची शिवजयंती संपन्न होत आहे या निमित्ताने आष्टी तालुकास्तरीय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन दैनिक युवक आधार च्या वतीने करण्यात आले असून उत्कृष्ट निबंधास रोख रक्कम प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याबाबत सविस्तर माहिती असे की छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेत आयोजन करण्यात आले असून या निबंधाचा विषय आहे शिवराय माझे आवडते राजा या विषयावर विद्यार्थ्यांनी सुवाच्छ अक्षरांमध्ये छत्रपती शिवरायांच्या जीवनाविषयी व कार्याबद्दल माहिती लिहून शाळेच्या मुख्याध्यापकाचे निबंधाच्या शेवटी सही व शिक्का मारून व्हाट्सअप वर पाठवायचे आहे ही स्पर्धा दोन गटात घेणार असून यामध्ये पहिली ते चौथी गट दुसरा गट पाचवी ते दहावी या निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकास 501द्वितीय क्रमांक 301व तृतीय क्रमांक 201 रुपयांचे बक्षीस असून दैनिक युवक आधारच्या वतीने स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रथम द्वितीय तृतीय येणारे निबंध वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्धी करण्यात येणार आहे .

**स्पर्धेचे नियम व अटी**

1) पहिली ते चौथी गटासाठी 300ते400 शब्दमर्यादा
2) पाचवी ते दहावी गटासाठी 500 ते700 शब्दमर्यादा
3) सुवाच्छअक्षरांमध्ये निबंध लिहून शेवटी इयत्ता विद्यार्थ्याचे नाव शाळेचे नाव मुख्याध्यापकाची सही शिक्का करून व्हाट्सअप वर पाठवायचे आहे. शाळेचा शिक्का सही नसेल तर निबंध स्वीकारले जाणार नाही
4)17 फेब्रुवारीपर्यंत हे निबंध महादेव आमले 8329273697 बाळासाहेब रकटाटे,9404258799या नंबरवर पाठवायचे आहे.

# द्रौपदाबाई आकात इंग्लिश स्कुलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**



परतूर येथील छत्रपती शिवाजीनगर मधील द्रौपदाबाई आकात इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी सायंकाळी उत्साहात संपन्न झाले.मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई आकात या उदघाट्क म्हणून उपस्थित होत्या.तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव कपील आकात हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे,भगवानराव आकात, उपाध्यक्ष कुणाल आकात,कैलास कादे, अक्षय आकात, यमुनाबाई आकात, वर्षाताई आकात, भक्तीताई आकात, बाबासाहेब तरवटे, कल्याण बागल, राजकुमार राऊत,सनील सर यांची उपस्थिती होती.

यावेळी चिमुकल्या मुलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक कलाविष्काराला प्रेक्षकांनी टाळ्याच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी बोलताना कपील आकात म्हणाले की,आमच्या संस्थेच्या मराठी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या अनेक शाळा आहेत.इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. या भाषेचे ज्ञान ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्हावे अशी स्व. बाबासाहेब भाऊंची इच्छा होती. त्यामुळे या शाळेचा प्रारंभ करण्यात आला. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात असेही आकात म्हणाले. याप्रसंगी डॉ. दिरंगे, कल्याण बागल यांनीही विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्येची देवता सरस्वती व स्व. बाबासाहेब भाऊंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याचवेळी उपस्थित मान्यवरांचा मुख्याध्यापिका श्रीमती शिलजा के. सीबी व कर्मचाऱ्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापिका श्रीमती शिलजा के. सीबी यांनी प्रास्ताविक करताना विद्यालयाय राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिलजा के. सीबी व शिक्षिका महाजन यांनी संयुक्तपणे केले.

### आज महासांगवी येथे सांगता कार्यक्रमास राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री मा.ना.पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती

# संत मिराबाई (आईसाहेब) संस्थान येथे आयोजित रक्तदान शिबिरात २७ रक्तदात्यांनी केले रक्तदान...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** संत मिराबाई (आईसाहेब) यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहा दरम्यान शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरात २७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या सप्ताहाचे हे २७ वे वर्ष असुन या मध्ये महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारानी आपली सेवा बजावली आहे. श्रीसंत मिराबाई (आईसाहेब) संस्थानच्या महंत राधाताई (आईसाहेब) महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शिव महापुराण कथा ही झाली असुन या दोन्ही कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. दररोज महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे होते. या वेळी आयोजित रक्तदान शिबीरासाठी स्वामी सानप, किसन सानप, शिवाजीराव गर्जे, विठ्ठल सांगळे, संतोष गर्जे यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. आज मिराबाई आईसाहेब संस्थान महासांगवीच्या मठाधिपती ह.भ.प.राधाताई महाराज यांचे सकाळी




१०:०० ते १२:०० वाजता काल्याचे किर्तन होणार असून नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री मा.ना.पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी भाविक भक्तांना या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने उपस्थित राहुन लाभ घ्यावा. असे आवाहन महासांगवी, कवडवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चांदवड विभागीय कार्यालयातील बाह्य स्रोत कर्मचारी यांना विज सुरक्षा साधनांचा वापर व सुरक्षा उपाय योजना याविषयी मार्गदर्शन

**दै. युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी**
**जनार्दन चव्हाण**



चांदवड विभागीय कार्यालयातील बाह्य स्रोत कर्मचारी यांना विजसुरक्षा साधनांचा वापर व सुरक्षा उपाययोजना याविषयी मार्गदर्शन करण्याचा कार्यक्रम चांदवड विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता केशव काळु माळी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता सदर कार्यक्रमास अतिरिक्त कार्यकारी अभियंता राठोड साहेब प्रशिक्षण केंद्र एकलहरे यांनी सुरक्षा पर विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच त्यांच्यासोबत प्रशिक्षण केंद्र एकलहरे येथील शेख साहेब यांनी देखील मार्गदर्शन केले व चांदवड योग्य कार्यालयाचे तिरिक्त कार्यकारी अभियंता श्री सुनिल रहिज साहेब यांनी कर्मचाऱ्यांना सुरक्षाविषयक योग्य प्रकारे मार्गदर्शन केले तसेच सदर कार्यक्रमाच्या वेळी बाह्य स्रोत कर्मचारी यांना मुख्य कार्यालयाच्या आदेशाने त्यांचे वेतन हे एचडीएफसी बँकेत जमा करण्याबाबत जे काही परिपत्रक आले होते त्या संदर्भात एचडीएफसी बँक मुंबई शाखा चे प्रमुख शेख साहेब यांनी देखील कर्मचाऱ्यांना पगार खाते संदर्भात सविस्तर माहिती दिली व मोठ्या प्रमाणात बाह्य कर्मचारी यांनी एचडीएफसी बँकेत यावेळी आपल्या खाते उघडले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश जोशी उच्च स्तर लिपिक मासे यांनी केले सदर कार्यक्रमास चांदवड विभागीय कार्यालय अंतर्गत असणारे बाह्य स्रोत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते व सर्व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधना वापरणे विषयक शपथ घेण्यात आली.

# कबड्डी स्पर्धेत आदर्श विद्यालय आंबोली विध्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून द्वितीय क्रमांक मिळविला.

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**
**डॉ. वेदांत ओव्हाळ वाडा सरकुंडी**

टाटा मोटर्स व योजक फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेत आदर्श विद्यालय आंबोलीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळविला.

विद्यालयातील विध्यार्थी कु. संदेश गणेश शिंदे याची बेस्ट रेडर म्हणून निवड झाली.तसेच टाटा मोटर्स समाज कल्याण विभागाकडून उत्कृष्ट खेळाडू म्हणून 10,000/- रुपये रोख शिष्यवृत्ती देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेत



सहभागी व विजेत्या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ शिंदे (मा. सभापती प. स. खेड ) सचिव श्री. बाळासाहेब शिंदे (मा. तज्ज्ञ संचालक कृषी उत्पन्न बाजारसमिती खेड )उपाध्यक्ष श्री. सखाराम काळडोके सर्व संचालक श्री. बापदेव शिक्षण प्रसारक मंडळ आंबोली, विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे हस्ते सत्कार व अभिनंदन करण्यात आले. स्पर्धा टाटा मोटर्स पिंपरी पुणे येथे आयोजित करण्यात आली.स्पर्धेसाठी टाटा मोटर्स पुणे सरव्यवस्थापक श्री. सुनिल सवाई साहेब, एच आर आदिती गुप्ता, उपसरव्यवस्थापक आडके साहेब यांच्या हस्ते विजेत्या संघाना चषक व वैयक्तिक बक्षीस विजेत्या खेळाडूंना 10000/- रुपयाचे धनादेश व चषक देण्यात आले. स्पर्धेचे पंच म्हणून काम टाटा मोटर्स कबड्डी संघाने केले. आदर्श विद्यालयातील संघाचा लागोपाठ तीन वर्षे क्रमांक आला आहे.संघास मार्गदर्शन करण्याचे काम विद्यालयातील क्रीडाशिक्षक श्री. शंकर शिंदे सर यांनी केले.

आदर्श विद्यालय आंबोली हे खेड तालुक्याच्या अतिशय दुर्गम भागात वसले आहे.कोणतीही सोई सुविधा नसताना, खेळाचे आवश्यक साहित्य उपलब्ध नसताना शालेय स्पर्धेमध्ये खेळाडू राज्य, राष्ट्रीय स्तरावर प्रविण्या प्राप्त खेळाडू आहेत. शालेय स्तरावर कोणतेही private coach नसताना विविध खेळात सहभागी होऊन राष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडू खेळले आहेत. जर शाळेला आणि खेळाडूंना खेळातील क्रीडा साहित्य उपलब्ध झाल्यास विध्यार्थी कोठेही कमी पडणार नाही असे विद्यालयातील क्रीडा शिक्षक श्री. शंकर शिंदे सर यांनी सांगितले.

# रस्सीखेचमध्ये एलआरटी कामोठे आणि एसएमएनएस संघ सरस

**दैनिक युवक आधार**
**पनवेवल (प्रतिनिधी)**

नमो चषक अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या रस्सीखेच स्पर्धेत पुरुषांच्या गटात एलआरटी कामोठे संघाने तर महिलांच्या गटात एसएमएनएस संघाने प्रथम पटकाविला. पुरुषांच्या गटात द्वितीय क्रमांक जॅग्वार कामोठे तर तृतीय क्रमांक मोरया फिटनेस कळंबोलीने महिलांच्या गटात एलआरटी रायडर्स कामोठे तर तृतीय क्रमांक साई स्पोर्टस संघाने मिळवला. उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे पनवेल विधानसभा मतदार संघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.




त्या अंतर्गत कामोठे मधील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर पुरुष व महिला गटाची रस्सीखेच स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, नमो चषकचे मुख्य आयोजक परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्पर्धेचे उद्‌घाटन कामोठे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, ज्येष्ठ नेत्या सुहासिनी शिवणेकर, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, हेमलता गोवारी, अरुणा भगत, जिल्हा चिटणीस विद्या तामखडे, प्रदीप भगत, रवी गोवारी, भाऊ भगत, लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल कामोठेच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, जय पावणेकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, मनोहर शिंगाडे, सुहास शिवडकर, यमुना प्रकाशन, कामोठे शहर अध्यक्ष वनिता पाटील, उपाध्यक्षा साधना आचार्य, फातिमा आलम, मनिषा



वणवे, वर्षा शेलार, सुरेखा लांडे, वैशाली घोलप, वैशाली साबळे, अरुणा शिंदे, जया गायकवाड, स्मिता यादव, विद्या शेलार, मयुरी जाधव, हर्षदा तुपे, सोनाली खरटमोल, दिपाली पवार, सारिका तामखडे, वनिता म पाटील, ललिता दोपलपुडी, देवांशू प्रबाळे, आयुष किंद्रे, यश भोईर, गौरव नाईक, अक्षय सिंग, कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, प्रवीण कोरडे, सागर ठाकरे, राहुल बुधे, आदित्य भगत, किरण जाधव, विकी टेकवडे, अमोल बिनवडे, अमित गोडसे, सुयोग वाफारे, प्रथमेश सातपुते, निलेश सरगर, आकाश शिंदे, शंकर कारंडे, सुयश कांबळे, मयुर शिंदे, प्राणिल पवार, आकाश सिंग, आयुष कातोरे, नयन चौगुले, पार्थ लाले, प्रज्वल, रितेश कानोजिया,ओम पाटील, करन जगदाळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. रस्सीखेच खेळ टग ऑफ वॉर या नावाने प्रसिद्ध आणि एक पारंपरिक खेळ आहे, जो ताकद, सहकार्य आणि रणनीती यांचा समतोल साधतो. या खेळात दोन संघ एकाच रस्सीच्या विरुद्ध बाजूंना उभे राहून एकमेकांना खेचण्याचा प्रयत्न करतात. जो संघ प्रतिस्पर्धी संघाला निश्चित मर्यादेपलीकडे खेचतो, तो विजेता ठरतो. हा खेळ हात, पाय आणि शरीराच्या स्नायूंना बळकट करतो. टीमवर्क आणि समन्वय वाढवण्याबरोबरच मानसिक तग धरण्याची क्षमता वाढवतो. हा खेळ खेळण्यास मजेदार असून शरीर तंदुरुस्त ठेवणारा असल्याने हा खेळ शाळा, महाविद्यालये, ग्रामीण भाग तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही खेळला जातो. त्यामुळे या खेळाचे महत्त्व लक्षात घेऊन या खेळाच्या प्रचारासाठी आणि खेळाडूंच्या विकासासाठी या स्पर्धेचे नमो चषक अंतर्गत भव्य दिव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील पुरुष गटातील प्रथम क्रमांकाला ७ हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक ३ हजार रुपये व चषक, महिला गटातील प्रथम पारितोषिक ७ हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये व चषक तर तृतीय पारितोषिक ३ हजार रुपये व चषक असे बक्षीस देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# अजिंक्य योद्धा" या ऐतिहासिक २ अंकी नाटकाचा शुभारंभी प्रयोग

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(पंकजकुमार पाटील):**




आत्ताच्या सोशल मिडिया आणि युट्युबर्सच्या काळात कोकणातल्या मातीशी नाळ जोडत आपल्या मराठ्यांचा जाज्वल्य ईतिहास अटकेपार पोहचवण्यासाठी कोकणातील युट्युबर्स आणि अविअनिल कलामंचाने छत्रपती संभाजी महाराजांच्या जिवनावर आधारित आणि संभाजी महाराजांचा खराखुरा इतिहास सांगणारं नाटक "अजिंक्य योद्धा" हे ऐतिहासिक २ अंकी नाटक रंगभूमीवर आणले आहे. या नाटकाचे लेखक / दिग्दर्शक =अविनाश गराटे असून अनिल गराटे,गौरी झोटे,अक्षय परब,अनंत पातये,अजय ओर्पे,सुरज परब,सन्नी जाधव,सचिन पानगले,नलेश कदम,प्रशांत कातकर,मयुर खाडे,आणि रविंद्र खैरे असे या नाटकातील कलाकार आहेत.कोकणी युट्युबर्स आणि पार्वतीपुत्र निर्मित अविअनिल कलामंच प्रस्तुत बुधवार दि.१२ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्रौ ठिक ८वाजता.छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर दादर येथे शुभारंभाचा प्रयोग सादर होणार आहे.तरी सर्व रसिकांनी शुभारंभाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहुन आम्हा कलावंताना सहकार्य करावे अशी विनंती अजिंक्य योध्दा या नाटकाचे लेखक/दिग्दर्शक अविनाश गराटे आणि आयोजक कोकणी युट्युबर्स यांनी केली आहे.तिकिटांसाठी व कार्यक्रमासाठी

संपर्क ९५९४९४७९१२ / ९७०२१३७७८०

## पतंग महोत्सव 2025 – नवी मुंबईत रंगला अनोखा सांस्कृतिक सोहळा !

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

नवी मुंबई फेस्ट ग्लोबल फाउंडेशन (NMFGF) च्या पतंग महोत्सव 2025 ने नवी मुंबईतील नागरिकांना एकत्र आणत आनंद, कला, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा अनोखा संगम घडवला. रविवारी फोर पॉईंट्स बाय शेरेटन, वाशी येथे रंगलेल्या या भव्य सोहळ्यात रंगबेरंगी पतंगांनी आकाश सजले, तर विविध सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या विशेष सोहळ्याला उत्तराखंड राज्याचे माजी वन व कृषिमंत्री हरक सिंग रावत आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे शहर अभियंता मा. श्री. शिरीष आरदवाड यांनी उपस्थित राहून या संकल्पनेचे कौतुक केले आणि स्वतः पतंग उडवून या अनोख्या महोत्सवाचा आनंद लुटला. या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोनक ॲडव्हर्टायझिंग चे अमरदीप सिंग आणि आर. के. महापात्रा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांना परवेज खान, परेश त्रिवेदी, डॉ.विजय शुक्ला, प्रवीण ठाकूर, हरमीत सिंग, उमेश चौधरी, अशोक मेहरा, डॉ. संजीव कुमार आणि इतर मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले. महोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी संगीतमय कार्यक्रम, विविध राज्यातील कलाकारांची सादरीकरणे आणि पारंपरिक तसेच आधुनिक खाद्यसंस्कृतीचे स्टॉल्स सजवण्यात आले होते. NMFGF ने या सोहळ्यातून नवोदित आणि स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले, ज्यामुळे नवी मुंबईचा सांस्कृतिक वारसा जपत नवी ओळख मिळेल. असे यावेळी आयोजकांनी सांगितले.या यशस्वी सोहळ्यानंतर NMFGF भविष्यात अधिक भव्य आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यास सज्ज आहे. नवी मुंबईच्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीला चालना देण्यासाठी फाउंडेशन महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. पतंग महोत्सव हा केवळ एक उत्सव नव्हता, तर सामाजिक एकतेचा एक ऐतिहासिक क्षण ठरला. NMFGF च्या पुढील उपक्रमांसाठी नागरिकांनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.




## शुभांगी राऊत यांची मुंबई पोलीस शिपाई (चालक) पदी निवड.

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**



सेलू येथील गटकळ करिअर अकॅडमी ची विद्यार्थीनी शुभांगी राऊत यांची मुंबई पोलीस शिपाई (चालक) पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे गटकळ अकॅडमी येथे स्वागत करण्यात आले. यावेळी अकॅडमीचे संचालक रामेश्वर गटकळ सर,दीपक गटकळ सर, ताठे सर, राठोड सर, P. S.I गणेश पवार सर, माजी जिल्हा परिषद सदस्य हिंगोली गजानन शिरसागर,शुभांगी राऊत यांचे वडील विश्वनाथ राऊत, भाऊ लिंबाजी राऊत, मामा गजानन कंठाळे, शिवाजीराव खाडे, गोविंद जोशी,महेश राऊत व अकॅडमीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकसहभागाच्या काठीचा आधार घेत सायमा टाकतेय एक-एक पाऊल...

## आवाहनाला प्रतिसाद देत दानशूरांनी केली १ लाख ३५ हजाराची मदत

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा येथील उपचाराअभावी अंपगत्व आलेल्या सायमा बेग हिच्यावर पुणे येथील संचेती हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असुन तिच्या प्रकृतीमध्ये चांगली सुधारणा होत असून सायमाचे वडील हे दुसऱ्याच्या शेतात सालगडी असुन त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने योग्य उपचार करू न शकल्याने सायमाला अंपगत्व आले होते. ही गंभीर बाब लक्षात येताच सय्यद शफाउद्दीन तसेच पत्रकार हमीदखान पठाण, पत्रकार जावेद शेख यांनी उपचारासाठी लोकसहभागाचे आवाहन केले. या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळत असुन बीड जिल्ह्यासह विविध



ठिकाणच्या दानशूरांनी आत्तापर्यंत १ लाख ३५ हजारांची मदत केली असून अजुनही मदतीचा ओघ सुरू आहे. सायमा ही मुलगी गेल्या ९ वर्षांपासून अंथरुणातच असल्याने शरीरावर याचे दुष्परिणाम झाल्याने काही भागावर जखमा झाल्या आहेत. त्या मुळे तिच्यावर करण्यात येणाऱ्या उपचाराला बांधा येत असून सध्या त्या जखमावरच उपचार होत असून लवकर जखमां बऱ्या झाल्या नाही तर तेथे ही सर्जरी करावी लागणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. एकुणच लोकसहभागातून मुलीवर उपचार होत असुन लोकही त्याला भरभरून प्रतिसाद देत असल्याने लोकसहभागाच्या काठीचा आधार घेत सायमा बेग एक-एक पाऊल पुढे टाकत आहे.

**कुटुंबाला धीर देत उपचाराचा घेतला आढावा...**
घटनेची गंभीरता पाहुन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला(आबुशेठ) यांनी सय्यद शफाउद्दीन, पत्रकार जावेद शेख यांच्या सह सायमा बेग याच्या कुटुंबाची भेट घेतली. तसेच आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत असा धीर देत संचेती हॉस्पिटलचे प्रमुख मा.डॉ.पराग संचेती यांच्याशी संवाद साधत उपचाराचा आढावा घेतला.

**उपचाराअभावी अंपगत्व येणं ही दुर्दैवी बाब :- सय्यद अब्दुल्ला**
उपचाराअभावी अंपगत्व येणं ही दुर्दैवी बाब असुन बेग कुटुंबाने घटनेची वाच्यता लवकर जाहीर केली असती तर सायमाला ९ वर्षे संघर्ष करावा लागला नसता तरी जी मदत बेग कुटुंबाला लागेल ती करू असे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला(आबुशेठ) यांनी सांगितले.

## कॉपीमुक्त परीक्षेसाठी शिक्षण विभाग सज्ज

### 18 परीक्षा केंद्रावर 6 हजार 87 विद्यार्थी देणार परीक्षा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**




**रिसोड** :-अमरावती मंडळा अंतर्गत इयत्ता 12 वी ची परीक्षा 11 फेब्रुवारी पासून सुरू होत असून रिसोड तालुक्यातील 18 परीक्षा केंद्रावर 6087 विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सदर बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी शिक्षण विभाग सज्ज असल्याची माहिती शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.तसेच विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जावे. परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान कुठल्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही.यासाठी शिक्षण विभाग सज्ज आहे.राज्यामध्ये अमरावती मंडळाची 12 वी ची परीक्षा 11 फेब्रुवारी ते 18 मार्चदरम्यान संपन्न होणार आहे. रिसोड तालुक्यामध्ये रिसोड शहर तसेच ग्रामीण अशा तालुक्यातील एकूण 18 परीक्षा केंद्रावर 6087 विद्यार्थी परीक्षेसाठी बसणार आहेत. यातील चार ते पाच संवेदनशील परीक्षा केंद्रावर काही पथकांची नेमणुक करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रावर कुठलीही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता शिक्षण विभागाकडून घेतल्या जाणार आहे.विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता परीक्षा देण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. बारावीची परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागासह संबंधित प्रशासन सज्ज झाले आहे. परीक्षा केंद्रावर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यासाठी शिक्षण विभाग, भरारी पथक यांच्यासह पोलिस प्रशासनाच्या पथक तयार करण्यात आली आहेत.

प्रतिक्रिया
जिल्ह्यामधे कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा व्हावी यासाठी जिल्हाधिकारी महोदयांच्या मार्गदर्शनाखाली, योग्य ती पावले उचलली जात असून कॉपीमुक्त अभियानांतर्गत शहरातील व तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन केले आहे. कॉपीमुक्त परीक्षेला प्राधान्य देत विद्यार्थ्यांनी आपले भविष्य उज्वल होण्यासाठी प्रयत्नरत राहावे. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षे दरम्यान कोणतीही अडचण येऊ नये याची दक्षता शिक्षण विभाग घेणार आहे.
**बद्रीनारायण कोकाटे, गटशिक्षणाधिकारी रिसोड**

## सह्याद्री रत्न शिवव्याख्याते धिरेंद्र ठाकूर यांच्या शिव विचारांचा जागर.

**युवक आधार प्रतिनिधी**
**रणिता ठाकूर**
**उरण रायगड**



रायगड जिल्ह्यामधील उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील सुप्रसिद्ध सह्याद्री रत्न शिवव्याख्याते श्धिरेंद्र ठाकूर यांचे विविध कॉलेज, क्लासेस ,मंडळे, शिबिरे यांच्या माध्यमातून शिव विचारांचा जागर घालण्याचं काम गेली सहा वर्ष अखंडितपणे चालू आहे. गतवर्षी शिवजयंतीच्या १९ फेब्रुवारीला एकाच दिवशी चार शिवचरित्रपर व्याख्यान देण्याचा विशेष उल्लेखनीय काम त्यांच्या हातून घडणे हे नक्कीच रायगड वासियांसाठी भूषणावह आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वश्रेष्ठ होते. ते फक्त रायगड, महाराष्ट्र, देशाचे नसून विश्वाचे भूषण आहेत. जगातील श्रेष्ठ सतरा राजांपैकी सर्वश्रेष्ठ ठरतात ते फक्त आपले 'छत्रपती शिवाजी राजे'. स्त्रीसहिष्णुता,रयतदक्षता आणि 'स्वधर्म स्वाभिमान आणि परधर्म सन्मान', 'साम्राज्यवाद नव्हे तर स्वराज्यवाद'अशा निती मूल्यांनी अनुसरीत अनमोल राज मार्ग दाखवणारे शिवछत्रपती व त्यांच अलौकिक कर्तुत्व ते व्याख्यानातून मांडत आहेत. आरमारातील कोकणपट्ट्यातील मावळ्यांचा इतिहास, दिनदर्शिकेत ३२ तारीख नसणं त्याकरता घेतला गेलेला ऐतिहासिक मागोवा. शिवछत्रपतींच्या स्वराज्यातील अष्टप्रतिके. शिवछत्रपतींच्या स्वराज्य प्रेरणेने निर्माण झालेली इतर स्वराज्ये ,अशा मथळ्यातून इतिहासाचे नावीन्य ते मांडत आहेत. आयुष्यात आलेल्या भयानक संकटाला सामोरे जायचे असेल तर चार गोष्टी लक्षात ठेवा. त्या म्हणजे एक शिवा, दुसरी छवा, तिसरी जिवा, आणि चौथी कावा, यातून शिव-शंभू आणि मावळ्यांच कर्तुत्व ह्या संदर्भात ऐतिहासिक दाखले देऊन संकटांशी झुंजण्याची प्रेरणा देणारे व्याख्यान हे शिव व्याख्याते धिरेंद्र ठाकूर यांच्या व्याख्यानाचे विशेष आहे. अलीकडेच सह्याद्री सामाजिक शिक्षण बहुउद्देशीय संस्था कल्याण ,फादर एग्नेल कॉलेज अशा विविध ठिकाणी त्यांची व्याख्याने संपन्न झालेली आहेत. धीरेंद्र ठाकूर यांनी शिवचिंतन नावाचं पुस्तक लिहिलं आहे आणि त्याचा प्रकाशन लवकरच होणार आहे. ठाकूर सरांनी लिहिलेल्या या शिवचंतन पुस्तकाचे महाराष्ट्रातील प्रत्येक शिवप्रेमी आतुरतेने वाट पाहत आहे धीरेंद्र ठाकूर यांच्या पुढील शिव कार्याला शिवभक्तांकडून शुभेच्छा मिळत आहेत.

### देव अनुभवावा लागतो.

हृदयरोगतज्ञ ! सुसज्ज दवाखाना
पाच वर्षांचे बाळ, निरागस डोळे
चमत्कार घडता नमस्कार मिळे
डॉ. काका, प्रश्न विचारते ऐक भोळे–

"तुम्ही माझे हृदय फाडणार ? १
मग माझा बाप्पा कुठे बसणार ?"
भाबड्या प्रश्नाने हेलावले मन
ऑपरेशन थिएटरमध्ये हलचल
आई सांगते–"देव हृदयात असतो"
देव कधी कोणी पाहिला ? दिसतो कसा ?

विज्ञानासमोर प्रश्न उभा ठाकला श्रद्धेचा
हृदय रक्तशून्य... क्षीण स्पंदन फार
भावविवश नास्तिक डॉक्टर नकळत
जोडतो हात... घडतो चमत्कार...

क्षणात हृदयातील देव जागा झाला
रक्तप्रवाह सुरू... ऑपरेशन यशस्वी
शुद्धीवर येताच लहानशी परी विचारी
"माझ्या हृदयातील देव दिसतो कसा ?"

डॉक्टर हसत सांगती बाळा,
"तो तुझ्यासारखा... निरागस, निर्मळ
श्वासात भासणारा, मनात वसणारा..."
हृदयातील "देव अनुभवावा लागतो..."

**सौ.रोहिणी अमोल पराडकर**
**कोल्हापूर 9767725552**

# पेण येथे शेकापचा संवाद मेळावा संपन्न

## विधानसभेला शेवटच्या क्षणात शिवसेनेने गद्दारी केली - भाई जयंत पाटील

दैनिक युवक आधार
पेण प्रतिनिधि

आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये काम करण्याचा उत्साह निर्माण करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने संपूर्ण रायगड जिल्हयात कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज पेण तालुक्यातील आगरी समाज हॉल येथे पेणमधील कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेली बोलताना भाई जयंत पाटील यांनी उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसेनेवर नाराजी व्यक्त करत विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेनेने आयत्या वेळी आमच्याशी गद्दारी केली असल्याचे सांगुन आता यापुढे कोणताही गद्दारी सहन केली जाणार नाही असे स्पष्ट केले.




यावेळी व्यासपीठावर....... उपस्थित होते. आपल्या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये एक नवचैतन्य निर्माण व्हावे आणि त्यांना पुन्हा एकदा कामाला लागण्यासाठी त्यांना योग्य त्या सूचना देण्यासाठी आज पेणमध्ये हा कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यकर्त्यांनी आता सावध राहून काम केले पाहिजे. विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे संजय राऊत यांनी मिडिया समोर येऊन अलिबाग, पेण आणि पनवेलची जागा शेकापला सोडली गेली असून उरणच्या जागेबाबत बोलणे चालू असल्याचे घोषित केले होते. मात्र आयत्या वेळी शिवसनेने याच जागांवर आपले उमेदवार उभे करून आमच्याशी गद्दारी केली आहे असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे पेण मध्ये जो शेकापने आमदार निवडून दिला तो त्याचे स्वार्थ साधून आपला पक्ष सोडून गेला. मात्र आता आजच्या तरुण कार्यकर्त्यांनी या गद्दारांना राजकारणातून हद्दपार करण्यासाठी सज्ज व्हा,पेणमध्ये उदया उगवणारा सूर्य आपलाच आहे असे सांगुन प्रामाणिक कार्यकर्ता आणि निष्ठेने काम करणाऱ्या तसेच पक्ष न बदलणाऱ्या कार्यकर्त्यांनाच पदे द्या आशा प्रकरच्या सूचना दिल्या. तर भारतीय जनता पक्षावर टीका करताना भाई जयंत पाटील यांनी पूर्वीचा ओरिजनल भाजप आता राहिला नाही, आत्ताची जवळपास पंच्याहत्तर टक्के भाजप ही बाहेरील आमदारांनी भरलेली आहे अशी टिका केली.

**अतुल म्हात्रे यांच्यावर जयंत पाटील यांची स्तुतीसुमने**
आपल्या पक्षाचे खजिनदार अतुल म्हात्रे यांच्या रूपाने आपल्याला एक प्रकाराचे वरदान लाभले आहे. पेण आणि उरण येथे होणाऱ्या तिसऱ्या मुंबईत आपल्या शेतकऱ्यांसाठी आणि प्रकल्पग्रस्तांसाठी त्यांचे मोलाचे योगदान आपल्याला लाभणार आहे. आपण सर्वांनी मिळून अतुल म्हात्रे यांना पाठबळ द्या आणि ठेकेदार म्हणून काम करणाऱ्यांना दुर ठेऊन एकदिलाने काम करा असे जयंत भाई पाटील यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करते वेळी सांगितले.

**जयंत भाईंच्या कार्यकर्त्यांना सूचना**
आता पूर्वीचे राजकारण राहीले नसले तरी शेकापचा कार्यकर्ता हा पक्षाशी एकनिष्ठच राहिला पाहिजे. त्यामुळे नव्याने पद भरती करत असताना जे पक्षाशी एकनिष्ठ असतील आणि दलबदलू नसतील अशांनाच पदे द्या, ज्यांना आपण मोठे केले त्यांना धडा शिकवा, हा झालेला संवाद मेळावा व्यापक करा आणि एकत्रीत येऊन पक्ष मजबूत करा.

# ध्येयवेडा समाजसेवी दत्ताभाई प्रभाळे

## कचरू चांभारे लिखित समाजाला आदर्श घालून देणाऱ्या काही व्यक्तींची लेखमाला सुरू करत आहोत त्यातील पहिले पुष्प

**दैनिक युवक आधार -** समाजसेवेचा वारसा हा संस्काराने वा आसक्तीने मनुष्य देहात उतरत असतो.समाजसेवेचे व्रत एखादा कोवळा तरूण स्वतःच्या क्षमतेच्या पलीकडे (ज्याला इंग्रजीत beyond म्हणतात) जपत असेल तर तो तरूण नक्कीच अवलिया असतो.आजच्या सदरात आपण अशाच ध्येयवेड्या समाजसेवीची ओळख करून घेणार आहोत. त्या तरूणाचं नाव आहे दत्ताभाई बाबासाहेब प्रभाळे.बीडच्या पूर्वेचे दहाबारा किमी अंतरावरील उमरद खालसा हे त्याचे जन्मगाव. शिक्षण व टेलरिंग व्यवसायाच्या निमित्तानं बीड शहरात वास्तव्याचं निमित्त झालं अन् पुढे राजकीय व सामाजिक कार्यामुळे गाव ते बीड पंचक्रोशी हे कार्यक्षेत्र झालं.2008-09 साली महाविद्यालयीन काळात दत्ताला अहिल्यामाई जयंती निमित्त चौंडी येथे जाण्याची संधी मिळाली. महाराष्ट्रातील एक अजातशत्रू व्यक्तिमत्व व विक्रमी काळ आमदारकी भूषविलेले सांगोल्याचे आमदार आम.गणपतराव देशमुख तिथे आलेले होते.तरूण मन हे अधिक स्वप्नाळू व सुपिक असते. तरूणाच्या मनात कोणतेही स्वप्न पेरून उगविता येते फक्त पेरणारा जाणता हवा.गणपतरावांची साधी राहणी ,सात्विक विचारसरणी ,निष्कलंक चरित्र तरूण दत्तास खूप भावले.आजोबा व वडिलांचे समाजसेवेचे संस्कार दत्तावर होतेच पण गणपतरावांच्या परीस स्पर्शाने वडिलोपार्जित संस्काराचे दृढीकरण झाले व दत्ताचा दत्ताभाई झाला.अतिशय कोवळ्या वयात दत्ताभाईने शेतकरी ,असंघटित व्यावसायिक यांच्यासाठी आंदोलन उभे केले.तरूण मुलांचे संघटन केले व समाज उपयोगी कामासाठी दत्ताभाई मित्र मंडळीने झोकून दिले.स्वतःच्या जन्मगावापासूनच समाजसेवेला सुरूवात केली. आई सरपंच झाल्यामुळे घरातच राजकीय वारसा तयार झाला.सिदोडच्या शाळेत वृक्षारोपन,रक्तदान शिबीर ,शाळेत भौतिक सुविधांची उपलब्धता अशा दीर्घकालीन लोकोपयोगी कामाने दत्ताभाईची सुरूवात झाली.

विचारधारा ही माणसाचे व्यक्तिमत्व घडवत आसते.दत्ताला सेवेचा व संस्काराचा वारसा वडिलोपार्जित होताच ,त्यात काही निवडक गुरूजींच्या शिकवणुकीची भर पडली,मुकुंद देशमुख सर व साळवे सर या गुरूजींप्रती दत्ताभाई कायम कृतज्ञ आहे. शिकत असलेल्या वयात दत्ता व त्याच्या मित्रमंडळीने भागीदारीतून एक रूग्णवाहिका विकत घेऊन ती सर्वसामान्यांसाठी नाममात्र दरात चालविली.आर्थिक बाजू बळकट नसतानाही सेवेप्रती असलेल्या बांधिलकेतून त्यांनी हे धाडसी पाऊल उचललं होतं.वित्ताची गाठ पदराला बांधल्याशिवाय अर्थ साधत नाही ,हे ओळखून दत्ताने स्वतः टेलरिंग व्यवसायातलं कौशल्य अर्जित केलं व इतर मित्रांनाही वेगवेगळ्या व्यवसायासाठी प्रवृत्त केलं.त्यातूनच अटोचालक ,दुकानदार,तांत्रिक कुशल कारागीर,व्यावसायिक





स्थिरस्थावर मित्र उभे राहिले. आज हाच मित्र परिवार कोणतेही काम सक्षमतेने करतो आहे. युवा वर्गाला सक्षमपणे उभं करत असताना दत्ताभाई मित्र परिवाराने माता भगिनींनाही आधार दिला. वैचारिक व आर्थिक पाठाबळ देत बचतगट व छोट्या गृह उद्योगातून महिला सबलीकरण घडवून आणले. दुर्दैवी लॉकडाऊनच्या काळात दत्ताभाईच्या समाजसेवेचा महायज्ञ सर्वांच्या लक्षात आले. मदत ग्रुप व जिओ जिंदगी हा शब्द बीडकरांसाठी आदरार्थी व जीवनदानार्थी बनू शकला तो जिओ जिंदगीच्या निःस्वार्थ सेवेमुळे.स्वतः दत्ताभाई ,लोकपत्रकार भागवत तावरे ,भास्कर ढवळे गुरूजी ,नेते दादासासेब मुंडे,शाहेदभाई पटेल,संतोष ढाकणे,प्रशांत पवार, उद्धव तोंडे सर, विठ्ठल तात्या घरत,अमोल पत्रकार जाधव यांनी जिओ जिंदगी सेवेचा महायज्ञ घडवून आणला.सरकारी कवाडे,रस्त्यावरची दुकाने बंद झालेली असताना अन्न पाण्यास मोताद झालेला खूप मोठा समुदाय बीड शहरात व भोवताली होता. पालावर पाल ठोकलेल्या अनेकांची जिंदगानी अन्नास पारखी झाली होती.अशावेळी जिओ जिंदगीने स्वतःपासून सुरूवात करत गावागावातून भाजी भाकरी जमविण्यास सुरूवात केली.रोज किमान पाच हजार ते गरजेनुसार आवश्यक तेव्हा सतरा हजारापर्यंत भाकरी जमा करून ,जमा केलेले अन्न प्रत्येक भुकेल्यापर्यंत जिओ जिंदगीच्या शिलेदारांनी नेले.तब्बल पासस्ट दिवस दत्ता भाई व जिओ जिंदगी त्यासाठी झटत होती. अज्ञात विषाणूला घाबरून प्रत्येक जण घरात थांबणंच हिताचं आहे हे सांगत,आतून दार बंद करत असताना दत्ताभाई रोज मोकळ्या आकाशाखाली धरतीवर फिरत होता.लॉकडाऊनच्या काळात एक म्हातारी आजी बीडमध्ये अडकल्या होत्या.वाहतुकीची सर्व साधने एकाच जागेवर थांबलेली होती.दत्ताभाईने आजीस थेट तिच्या गावी वडवणी तालुक्यातील तिगांव ला मोटरसायकलवरून नेऊन सोडले.दत्ताभाई म्हणतो परतीला निघताना आजीने मायेने माझ्या तोंडावरून फिरविलेला हात ,हेच माझे बक्षीस व हाच माझा आशीर्वाद.गंभीर आजार प्रसंगी रक्ताची गरज निर्माण झाली की ,अनोळखी इसमाचा फोन आला तरी दत्ताभाईची सवारी हजरच. समाजसेवेचा निःस्वार्थ वारसा दत्ताभाईच्या नसानसातून अखंड वाहतो आहे. अलीकडील काळात दत्ताभाई राज्यातील प्रसिद्ध वक्ते मा. दादासाहेब मुंडे यांचे विश्वासु म्हणून कार्य पाहत असून त्यांच्या सोबतच कार्य करण्याची संधी स्वीकारली आहे .वृक्षारोपन हा दत्ताभाईचा आवडता छंद. माणसं जगवायची असतील तर झाडे जगवा.असं दत्ताभाईचे ब्रीद. दत्ताभाईच्या वर्तनाचे अनुकरण सर्वच तरूणांनी करायला हवे. देशाची खरी समृद्धी ही आहे. निकोप समाज स्वास्थ्यासाठी झटत राहणं व दुस-यासही प्रवृत्त करणं.इंनफ्ट इंडिया, वृध्द आश्रम,बालघर,बालकआश्रम,आदी ठिकाणी मदती ला धावून भेट देण्याचे कर्तव्य बजावत ही खरी समाजसेवा आहे.यात विशेष तरूणांची समाजसेवा तर अधिक उठून दिसते.

जमेल तेवढं नव्हे तर जितकं करता येईल त्यापेक्षा अधिक काम करायचं .हा दत्ताभाईचा पिंड. आदर्श लोकांचे अनुकरण करता करता दत्ताभाई स्वतःच एक आदर्श झाला ; हे दत्ताभाईच्या लक्षातही आले नाही.पण दत्ताभाई युवकांचा आयकॉन आहे.हे कुणीच नाकारू शकत नाही.ना जातीसाठी, ना धर्मासाठी आम्ही लढतोय जनसामान्यांसाठी असे सांगणारा भाई समाजसेवेच्या दिवसेंदिवस स्वार होऊन ,लोकांसाठी अहोरात्र धावणा-या दत्ताभाईस हार्दिक शुभेच्छा .

**दत्ताभाई प्रभाळे मो.बा. 9657570182.**
**शब्दांकन कचरू चांभारे**
**व्यक्तिविशेष पत्रकार**
**मुख्याध्यापक जि.प.प्रा.शाळा**
**मन्यारवाडी ता.जि.बीड.**
**9421384434**